ईयार्नि

0068605

FORM-1A — N.C.R.B. I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. २४, वर्ष Year २०२३ दिनांक Date २६/०६/२३

2. (i) अधिनियम Act ७, कलमे Sections म. प्र. अधि. १२८८

   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......

   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून २३/०६/२३ वेळ ११.४०, तारीख पर्यंत २६/०६/२३ वेळ १३.४६ वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 ✓(5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २३/०६/२०२३, वेळ ११.०० वा.
   Information received at P. S. Date, Time

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २६/२०२३ तारीख २६/०६/२३ वेळ २२.२४
   General Diary Reference : Entry No., Date, Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लाचलुचपत मागणी स्विकारणे, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव इमारत व कारखाना विभाग, ठिकाणाचे नंबर ......, गल्ली र. रा. मसला, रस्त्याचे नाव ......
   Address of Occurrence Name एफ/साउथ वॉर्ड, परेल, मुंबई. No. Ward, Name of road

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name शिवानंद शेट्टी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name देजप्पा शेट्टी

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५५ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८४००४१०६९

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation हॉटेल चालक

   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......

   (h) पत्ता Address : ......, गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. ......, फोन / मो. नं. Phone/M. No. ......, पॅन नं. PAN No. ......, वोटर्स नं. Card No. ......

   रस्त्याचे नाव Road १००३/३ वर्ल्ड क्रेस्ट, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place सेनापती बापट मार्ग, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......

   तालुका Taluka लोअर परेल, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   आलोसे श्री. मच्छिंद्र नामदेव तांदळे वय ५०, सहा. अभियंता (इ.व.का) एफ/साउथ विभाग परेल मुं. राहणार २०७, आदित्य हाईट्स, प्लॉट नं २६/३१, सेक्टर १८, खारघर पनवेल, मो. ९८१९४५२३९७.

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

दि. २६/०६/२०२३

# जबाब

इसम. शिवानंद देजप्पा शेट्टी, वय ५५, धंदा: हॉटेल चालक, रा.ठि. १००३/ई, वर्ल्ड क्रेस्ट, सेनापति बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई १३ यांचा स्वतंत्र पानावरती मराठीत संगणकावर टंकलिखित केलेला जबाब नमूद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] 26/06/2023

(अमोल शिंदे)
पोलीस निरीक्षक
लोप्रवि, मुंबई

[signature] 26/06/2023

**जबाब** दिनांक २६/०६/२०२३

मी शिवानंद देजप्पा शेट्टी वय ५५ वर्षे, धंदा – व्यवसाय (हॉटेल मालक), रा.ठी. १००३/ई, वर्ल्ड क्रेस्ट, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई – १३, मो. क्र. ९८२००५१०६९, आधार कार्ड क्र. ८०४३ ०७४४ ९२८५

———

मी वरीलप्रमाणे असून मागील ०४ वर्षापासून वरील नमुद पत्त्यावर माझे कुंटुबियासह रहात आहे. माझे 'राष्ट्रीय व्हेज रेस्टारंट', शॉप न. ९ ते १४, मिठाबाई बिल्डिग, आचार्य दोडे मार्ग, शिवडी, मुंबई या नावाचे हॉटेल असून त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून माझा व कुंटुबियाचा उदरनिर्वाह चालतो.

माझे राष्ट्रीय व्हेज नावाचे रेस्टारंट ६० वर्षपेक्षा जुने असुन हॉटेलची इमारत ही ९० वर्षापुर्वीची आहे. दिनांक १५/०८/१९९७ रोजी पुर्वीच्या बांधकामाचा आराखडा हा मुंबई महानगर पालिकेच्या शासकिय अध्यादेश क्र. ८५३ प्रमाणे (पोटमाळा/लॉफ्ट) बांधकाम संरक्षीत करण्यात आले आहे.

दि. १७/०६/२०२३ रोजी मी घरी असतांना माझ्या हॉटेलचे मॅनेजर श्री कृष्णा मौल्या यांनी सकाळी १०.०० वा. सुमारास फोन वरुन कळविले की, एफ/साउथ, बी.एम.सी., वार्डचे ज्युनियर इंजिनियर हे हॉटेलची मोजणी व पाहणी करण्यास आले आहेत. सदरवेळी मी फोनव्दारे ज्युनियर इंजिनियर यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी मला एफ/साउथ, बी.एम.सी., कार्यालयास प्रत्यक्ष येवुन भेटण्यास सांगितले. त्यानंतर दि. १९/०६/२०२३ रोजी सोमवारी सकाळी १०.३० वा. सुमारास मो.न. ७७७५९९९३८८ वरुन मला फोन आला. सदर व्यक्तीने त्यांचे नाव श्री नागमोडे, ज्युनियर इंजिनियर एफ/साउथ, बी.एम.सी वार्ड येथून बोलत असल्याचे सांगुन त्यांनी कार्यालयात येवुन भेटण्यास सांगितले. त्यावरुन मी दुपारी १२.१५ वा. सुमारास ज्युनियर इंजिनियर श्री नागमोडे व त्यांचे वरिष्ठ श्री तादंळे, सहाय्यक अभियंता एफ/साउथ, बी.एम.सी वार्ड यांना भेटले असता त्यांनी माझ्या राष्ट्रीय व्हेज रेस्टॉरन्टमधील पोटमाळा/लॉफ्ट बेकायदेशीर असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याचे सांगितले. सदरवेळी मी माझ्या रेस्टॉरन्ट विरूध्द कोणी तक्रार केली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता श्री तांदळे व श्री नागमोडे यांनी तक्रारदार अगर तक्रारीबाबत काही एक माहिती न देता मला पुन्हा दि. २०/०६/२०२३ रोजी पुन्हा कार्यालयात येण्यास सांगितले.

त्यांनतर दि. २०/०६/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता मला पुन्हा श्री नागमोडे यांनी त्यांचे मोबाईलवरुन कॉल करुन पुन्हा कार्यालयात हजर रहाण्यास सांगितले. त्यावरुन मी दि. २०/०६/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. ज्युनियर इंजिनियर श्री नागमोडे व त्यांचे वरिष्ठ श्री तांदळे यांना कागदपत्रांसह कार्यालयास भेटलो. सदरवेळी माझे हॉटेलचे पोटमाळा/लॉफ्ट बेकायदेशीर असल्याबाबत प्राप्त तक्रारीवरून निष्कासन कारवाईची नोटीस न देण्यासाठी सहाय्यक अभियंता श्री. तांदळे यांनी त्यांच्या टेबलावरील कागदावर मराठीमध्ये अंक लिहुन रु. ३,७५,००००/– इतकी रक्कम निष्कासन कारवाई टाळण्यासाठी दयावी लागेल असे सांगितले.

मला श्री तांदळे, सहायक अभियंता व श्री नागमोडे कनिष्ठ अभियंता यांना रु.३,७५,०००/– इतक्या रक्कमेची लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २२/०६/२०२३ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयात हजर राहून वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ. हर्षल चव्हाण व पो.नि. अमोल शिंदे यांना भेटुन श्री तांदळे, सहायक अभियता व श्री नागमोडे कनिष्ठ अभियंता हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मी स्वहस्ताक्षरात इंग्रजी भाषेमध्ये तक्रार अर्ज लिहुन त्यावर सही करून दिली.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच हजर झाल्यानंतर तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पो.नि.

फिर्यादी श्री शिवानंद शेटटी यांचा दि.२६/०६/२०२३ रोजीचा जबाब पुढे सुरु ......

शिंदे यांनी सांगितलेली हकीकत व मी दिलेली लेखी तक्रार सारखीच असल्याचे पंचानी खात्री करून माझा तक्रार अर्ज वाचून त्यावर सहया केल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी समक्ष म्हणून सही करुन तो तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी दि. २२/०६/२०२३ रोजी तक्रार अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत विचारणा केली असता, त्यावेळी मी असे सांगितले की, लोकसेवक श्री तांदळे यांनी मला दि. २३/०६/२०२३ रोजी त्यांच्या कार्यालयात भेटावयास बोलविले आहे. त्यामुळे पो.नि. शिंदे यांनी दि. २३/०६/२०२३ रोजी पडताळणी करण्याचे सांगितले. त्यावरुन दिनांक २२/०६/२०२३ रोजी पडताळणी कारवाई/पंचनामा झाला नाही. पो.नि. शिंदे यांनी दि. २३/०६/२०२३ रोजी मला व पंचास ला.प्र.वि. कार्यालयास सकाळी पडताळणी कारवाई करीता हजर रहाण्यास सांगितले.

मी दिनांक २३/०६./२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयास सकाळी १०.०० वाजण्याच्या दरम्यान हजर झालो. त्यावेळी दोन शासकीय पंच तसेच पडताळणी/सापळा कारवाई करीता नेमणूकीस असलेले अंमलदार, चालक यांची ओळख करुन देण्यात आली.

दिनांक २३/०६/२०२३ रोजी लोकसेवक यांच्या कार्यालयात जावुन पडताळणी करावयाची असून सदर पडताळणी दरम्यान होणारे संभाषण हे मला लावण्यात येणाऱ्या डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे मला व पंचास स.पो.आ. हर्षल चव्हाण आणि पो.नि. अमोल शिंदे यांनी सांगितले.

त्यांनतर मी, पो.नि. शिंदे, पंच कुपटे व पो. अंमलदार मठपती असे सर्व माझ्या खाजगी वाहन एम.जी. एस्टर कंपनीची एम.एच.०१ ई.एफ. २७३५ मधून पडताळणीकरीता गेलो. तसेच पथकातील इतर अधिकारी व अंमलदार व पंच हे सरकारी वाहनाने आमचे पाठीमागे आले. सुमारे ११.४० वाजता बी.ए. रोड वरील मुंबई दरबार हॉटेलच्या समोर याठिकाणी आम्ही पोहचलो. पो.नि. शिंदे व पो. अंमलदार मठपती यांनी रेकॉडर ऑन करून माझे शर्टाच्या आतील बनियानला लावला त्यानंतर मी व पंच गाडीतुन खाली उतरून लोकसेवकाच्या एफ/साऊथ येथिल कार्यालयात गेलो. त्यावेळी मी व पंच असे एफ/साऊथ इमारतीच्या दुस—या मजल्यावरील श्री. तांदळे यांच्या कक्षात जावुन त्यांची भेट घेतली. सदरवेळी संभाषणा दरम्यान श्री. तांदळे यांनी श्री. नागमोडे यांना देखील कक्षात बोलावुन घेतले. त्यानंतर श्री. तांदळे यांनी पंच श्री. कुपटे यांच्याबाबत विचारणा करून त्यांना बाहेर जाण्यास सांगितले. तेव्हा मी माझे हॉटेलच्या आलेल्या तक्रारीबाबत श्री तांदळे यांचे बरोबर चर्चा करीत असता, मी दि. २०/०६/२०२३ रोजी माझेकडे श्री तांदळे यांनी मागीतलेले रु.३,७५,०००/— रक्कमेबाबत चर्चा करीत असताना श्री तांदळे मला म्हणाले की, तुमच्या मनात जे असेल ते करा.. तुमच्यावर कारवाई होणार नाही. तेव्हा मी त्यांना माझेकडुन दोन लाख रुपये व्यवस्था होवु शकते असे सांगितले. तेव्हा श्री तांदळे म्हणाले की, ठिक आहे... तुमच्या हिसाबाप्रमाणे जे आहे ते करा.

त्यानंतर मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नसल्याचे सांगुन पुढील आठवडयाची वेळ मागितली. त्यावर श्री तांदळे म्हणाले की, सदरचे दोन लाख रुपये पुढच्या आठवडयात दिले तरी चालतील. तेव्हा मी श्री तांदळे यांना म्हणालो की, सदरचे दोन लाख रुपये नागमोडे यांचेकडे देवु का याबाबत श्री तांदळे यांना विचारले असता त्यांनी होकार दिला. श्री तांदळे यांनी लाचेची मागणी करून रक्कम स्विकारणेकरीता सहमती दर्शविल्याने व दोन लाख पुढील आठवडयात श्री तांदळे यांनी घेण्याचे कबुल केल्यानंतर मी पुन्हा पडताळणी पथक थांबले होते त्या ठिकाणी परत आलो.

सदरवेळी पडताळणी दरम्यान आमच्यामध्ये झालेले संभाषण मी व पंचानी ऐकल्यावर श्री तांदळे यांनी केलेली दोन लाख रक्कमेची लाचेची मागणी स्पष्ट झाली व दिनांक २६/०६/२०२३ रोजी सापळा कारवाई करणार असल्याचे सपोआ चव्हाण, पो.नि. अमोल शिंदे यांनी सांगितले.

त्यानंतर मी दिनांक २६/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयास सकाळी ११.०० वाजता हजर झालो. त्यानंतर काही वेळाने पोनि शिंदे यांनी पुढील सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती देवुन पंचांना बोलावले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे हे मला व दोन पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. शिंदे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, दोन पंच व पो.नि. शिंदे, स.पो.आ. चव्हाण हे गोपनिय रुममध्ये आलो असता पो.नि. शिंदे यांनी तेथे उपस्थीत असलेले पोलीस अंमलदार यांची ओळख श्री. कावले अशी करुन दिली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला श्री तांदळे यांना दयावयाचे रु. २,००,०००/– ( अक्षरी रु. दोन लाख ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. ५००/– दराच्या ४०० नोटा, एकुण रु. २,००,०००/– (अक्षरी रु. दोन लाख) त्यांचेकडे दिले. सदर रक्कम सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणार असल्याचे पो.नि. शिंदे यांनी सांगितले. त्यानंतर श्री. कावले यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस पावडर लावणार असल्याचे सांगुन सदर पावडरचे नाव अँथ्रासीन पावडर असल्याचे सांगितले. त्यांचे गुणधर्म सांगुन मला व पंचाना त्यांचा डेमो दाखवुन सदरची पावडर मी दिलेल्या लाच रक्कमेच्या नोटाना लावली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम दोन वेगवेगळया सफेद रंगाच्या कागदाच्या लिफाफ्यामध्ये ठेवुन माझेकडील कापडी पिशवीत ठेवली.

त्यानंतर श्री. तादंळे यांनी लाच स्वीकारल्यानंतर मला पो.नि. शिंदे यांच्या मोबाईलवर मिस कॉल द्वारे इशारा देण्याच्या सुचना दिल्या. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच श्री तांदळे यांस पकडतील असे सांगितले.

त्यानंतर मी, दोन पंच, पो.नि. शिंदे, स.पो.आ. चव्हाण व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाचे आवारात आलो असता माझी सापळा पथकाबरोबर ओळख करुन दिली. त्यानंतर तेथे उभे असलेल्या दोन शासकीय वाहने व माझे खाजगी वाहनात वर नमुद अधिकारी व पथक असे आम्ही मिळुन श्री तांदळे यांचे एफ साउथ, म.न.पा. परेल कार्यालय जवळील मुंबई दरबार हॉटेल जवळ थांबलो. तेव्हा माझे वाहनामध्ये पो.नि. शिंदे यांनी मला योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी घातलेल्या शर्टाच्या आतील बनियानमध्ये लावला. त्यानंतर मी, पंच श्री. कुपटे असे श्री तांदळे यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. व सापळा कारवाईतील पथक हे श्री तांदळे यांचे कार्यालयाच्या आजुबाजुचे परीसरात कोणसही संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन राहीले.

मी, श्री तांदळे यांची त्यांचे कक्षात भेट घेतली असता तेथे फक्त श्री तांदळे हजर असुन त्यावेळी माझे प्रकरणाबाबत श्री. तांदळे यांचेशी चर्चा करीत असताना त्यांनी माझेकडे दोन लाख रक्कम आणली का याबाबत हाताने इशारा केला तेव्हा मी माझे कडील कापडी पिशवीतून दोन सफेद रंगाची पाकीटे त्यामध्ये दोन लाख रक्कम असलेले काढुन श्री. तांदळे यांच्या समोर धरली असता, श्री तांदळे यांनी सदरची पाकीटे हातामध्ये घेवुन मला म्हणाले की, आता काही प्रोब्लेम नसुन काही इश्यु होणार नाही. त्यानंतर सदर पाकीटे श्री. तांदळे यांनी त्यांच्या

फिर्यादी श्री शिवानंद शेटटी यांचा दि.२६/०६/२०२३ रोजीचा जबाब पुढे सुरु ......

हातामध्ये घेवून त्यांच्या डाव्या बाजुला असलेल्या टेबलाच्या खालील ड्रॉवरवर ठेवले. त्यानंतर मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी पो.नि. शिंदे यांना त्यांचे मोबाईलवर माझे मोबाईल फोनद्वारे मिस्डकॉल करुन दिला. त्यानंतर सापळा पथकातील पोलीसांनी तात्काळ लोकसेवक तांदळे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी यांनी त्यांची संबधीत कारवाई तेथेच पुर्ण करुन पुढील कार्यवाहीकरीता आम्ही सर्व श्री तांदळे यांचेसहीत अॅन्टीकरप्शन ऑफिस मुंबई येथे आलो.

माझा श्री. तांदळे यांचेशी कोणताही वैयक्तिक आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

तरी श्री. मच्छिंद्र नामदेव तांदळे, दुयम अभियंता, (अति. कार्यभार सहायक अभियंता), म.न.पा. एफ साउथ वार्ड, परेल, मुंबई यांनी माझे मालकीचे हॉटेल राष्ट्रीय व्हेज हॉटेल, शिवडी मुंबई या आस्थापनेचा पोटपाळा/लॉफट बांधकाम बेकायदेशीर असल्याचे सांगुन व त्यावर प्राप्त तक्रारीवरुन माझे हॉटेलचा पोटमाळा तोडण्याची नोटीस मला न देण्यासाठी माझेकडे दि.२३/०६/२०२३ रोजी पंचासमक्ष रु.२,००,०००/– लाचेची मागणी केली व दि. २६/०६/२०२३ रोजी पंचासमक्ष माझेकडुन रु.२,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री. मच्छिंद्र नामदेव तांदळे, दुयम अभियंता, (अति. कार्यभार सहायक अभियंता), म.न.पा. एफ साउथ वार्ड, परेल, मुंबई यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वर नमुद जबाब पो.नि. अमोल शिंदे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मला हिन्दी व मराठी भाषेत समजावुन सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

26/06/2023

( अमोल शिंदे ),

पोलीस निरीक्षक,

लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

26/06/2023

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ निरंक

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वे. व. दि यातील कॉ. नं ७ मधील आलोसे यांनी यातील तक्रारदार यांचे मालकीचे हॉटेल राष्ट्रीय व्हेज रेस्टॉरंट, शिवडी या आस्थापनेच्या पोटमाळा (लॉफ्ट) बांधकाम बेकायदेशिर असल्याचे प्राप्त तक्रारीवरून नमुद हॉटेलवर निष्कासन कारवाईची नोटीस जारी न करण्याकरीता दि. २३/०६/२३ च्या झालेल्या पंचासमक्ष पडताळणी दरम्यान रु. ८ लाख लाचेची मागणी केली व दि. २८/०६/२३ रोजी पंचासमक्ष झालेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे यांनी त्यांच्या कार्यालयात तक्रारदार यांचे कडुन रु. ८ लाख लाचेची रक्कम स्विकारली म्हणून आलोसे यांचे विरुद्ध कलम ७, भ्र. प्र. कायदा १९८८ अन्वये नोंद असे.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अमोल शिंदे पोलीस निरीक्षक लाप्रवि मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........................, जिल्हा..................., राज्य...................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) 28/06/2023

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही 28/06/2023

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अमोल शिंदे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई.

Posting

Code No. of I. O. ..................................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**